# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:28.03.2025** **वारःशुक्रवार**

---

1. स्थलांतर आणि परदेशी नागरिक विधेयक, 2025 लोकसभेत मंजूर
2. 2025-26 च्या केंद्रीय अर्थसंकल्पाच्या संसदीय मंजुरीची प्रक्रिया पूर्ण
3. देशात लवकरच सहकारी तत्त्वावर टॅक्सी उपक्रम
4. जम्मू आणि काश्मिरमध्ये चकमकीत तीन दहशतवादी ठार; 3 जवानांना वीरमरण आणि
5. खेलो इंडिया पॅरा क्रिडास्पर्धांची सांगता, हरियाणा अव्वल स्थानी

**स्थलांतर विधेयक**

स्थलांतर आणि परदेशी नागरिक विधेयक, 2025 काल लोकसभेत संमत करण्यात आलं. स्थलांतरविषयक कायद्यांचं आधुनिकीकरण करणं आणि पारपत्रं, प्रवासविषयक दस्तऐवज, व्हिसा आणि नोंदणी यासंदर्भात केंद्र सरकारला काही विशिष्ट अधिकार देणं हा या विधेयकाचा उद्देश आहे. या विधेयकावर सभागृहात झालेल्या चर्चेला उत्तर देताना देताना गृहमंत्री अमित शहा यांनी राष्ट्रीय सुरक्षा बळकट करण्याच्या दृष्टीनं हे विधेयक अत्यंत महत्त्वाचं असल्याचं सांगितलं. भारत हा भू-राजकीय नव्हे तर भू-सांस्कृतिक देश आहे. स्थलांतरितांचं स्वागत करून त्यांचं रक्षण करण्याचा भारताला दीर्घकाळचा इतिहास आहे. भारत हे जगभरातील अल्पसंख्याकांसाठी कायमच सुरक्षित आश्रयस्थान आणि त्यांना सन्मानाचं जीवन जगण्याचं ठिकाण राहिलं आहे; असं शहा म्हणाले. मात्र त्याचवेळी देशाची शांतता धोक्यात आणण्यासाठी इथे येत असलेल्या स्थलांतरितांवर कठोर कारवाई केली जाईल असा इशाराही शहा यांनी दिला.

दरम्यान, काल राज्यसभेत काल वित्त विधेयकावर चर्चा होऊन ते लोकसभेकडे परत पाठवण्यात आल्यानं 2025-26 च्या केंद्रीय अर्थसंकल्पाच्या संसदीय मंजुरीची प्रक्रिया पूर्ण झाली. लोकसभेनं वित्त विधेयकाला मंगळवारी मंजुरी दिली होती. कर निश्चिती करणं, व्यवसाय सुलभतेला चालना देणं आणि भारतीय करदात्यांचा सन्मान करणं हा 2025 च्या वित्त विधेयकाचा मुख्य उद्देश असल्याचं अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सभागृहात वित्त विधेयकावरील चर्चेला उत्तर देताना सांगितलं.

देशातील अन्नपदार्थांच्या वाढत्या किमती, शिक्षण, आरोग्यसुविधा, सर्वसामान्यांच्या घरगुती खर्चात होणारी वाढ आणि बेरोजगारीचा दर वाढला असल्याची टिका काँग्रेसचे पी चिदंबरम यांनी काल चर्चेला सुरुवात करताना केली. गरीब लोकांची क्रयशक्ती कमी होत आहे आणि खाजगी गुंतवणूक मंदावली आहे. असा दावा तृणमूल काँग्रेसच्या सागरिका घोष यांनी केला. आम आदमी पक्षाचे राघव चढ्ढा यांनी भारतीय नागरिकांना भरावा लागणाऱ्या कररचनेसंदर्भात टिका केली.

**सहकार टॅक्सी**

केंद्र सरकार ओला-उबर यासारख्या व्यावसायिक सेवांच्या धर्तीवर सहकार टॅक्सी हा सहकारी तत्त्वावर चालवला जाणारा उपक्रम सुरू करणार असल्याची घोषणा केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी काल केली. लोकसभेततील एका चर्चेत बोलताना शहा यांनी हा उपक्रम सहकार से समृद्धी या धोरणाशी सुसंगत असल्याचं सांगितलं. या उपक्रमांतर्गत अत्यंत मोठ्या

स्वरुपात सहकारी टॅक्सी सेवा सुरू करण्यात येणार असून त्याअंतर्गत दुचाकी, टॅक्सी, रिक्षा आणि चारचाकी गाड्यांची नोंदणी करता येऊ शकेल आणि त्याचा नफा थेट चालकाला मिळेल, अशी माहिती सहकार मंत्र्यांनी दिली.

**<u>पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल बेल्जियमचे राजा फिलिप यांच्याशी दुरध्वनीवर चर्चा केली. भारत आणि बेल्जियमदरम्यान, द्विपक्षीय संबंध दृढ करणं, व्यापार आणि गुंतवणूक वाढविण्यासाठी आणि नवोन्मेष तसंच शाश्वत सहकार्य वाढविण्यावर चर्चा झाल्याचं पंतप्रधानांनी समाज माध्यमावरील संदेशांत सांगितलं.

**<u>पंतप्रधान-जपान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्लीत जपानच्या व्यापारी शिष्टमंडळाचे अध्यक्ष ताकेशी निनामी यांच्या नेतृत्वाखालील उच्चस्तरीय शिष्टमंडळाची भेट घेतली. भारत आणि जपानमधील आर्थिक सहकार्य अधिक दृढ करण्यासाठीच्या मुद्यांवर यावेळी चर्चा झाली. या चर्चेत द्विपक्षीय व्यापार मजबूत करणे, गुंतवणूकीच्या संधी वाढवणे आणि कृषी, सागरी उत्पादने, अवकाश, संरक्षण, विमा, तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा, नागरी विमान वाहतूक, स्वच्छ ऊर्जा, अणुऊर्जा आणि लघुउद्योग क्षेत्रातील भागीदारी यासारख्या प्रमुख क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवणे यावर चर्चा झाली.

**<u>जम्मू-काश्मीर</u>**

जम्मू आणि काश्मिरमध्ये कथुआ जिल्ह्यात सुफियाच्या जंगलात काल झालेल्या चकमकीत तीन दहशतवादी ठार झाले आणि तीन जवानांना वीरमरण आलं. तर एका पोलिस उपअधीक्षकांसह चार सुरक्षा कर्मचारी आणि पॅरा कमांडो जवान जखमी झाले आहेत. जुधाना भागातील जंगलात काल सकाळपासून दहशतवाद्यांचा शोध सुरु असताना या लपून बसलेल्या दहशतवाद्यांनी सुरक्षा कर्मचाऱ्यांवर हल्ला केला.

**<u>मार्को-रुबिओ</u>**

विनेझुएलाने गयानावर हल्ला केल्यास अमेरिका चोख प्रत्युत्तर देईल असा इशारा अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ यांनी दिला आहे. तेल आणि वायुंचा साठा असलेल्या भागासह दोनही प्रदेशांदरम्यान संघर्ष सुरु आहे. या पार्श्वभूमीवर रुबिओ यांनी हा इशारा दिला आहे. अमेरिकन परराष्ट्रमंत्री कॅरिबियनच्या तीन देशांच्या दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात काल गयाना इथं पोहोचले आहेत. डोनाल्ड ट्रम्प प्रशासन या भागात ऊर्जा क्षेत्रातील श्रोतांसंदर्भात मुक्त व्यापाराला प्रोत्साहन देणं आणि बेकायदेशीर स्थलांतर, अंमली पदार्थांची तस्करी तसंच टोळ्यांदरम्यान होणारा संघर्ष रोखण्यासाठी प्रयत्न करत असल्याचं ते म्हणाले. त्यांनी काल गयानाचे अध्यक्ष इरफान अली आणि इतर अधिकाऱ्यांशी जॉर्जटाऊनमध्ये चर्चा केली. गयाना सरकारनं अमेरिकन नौदलाबरोबर युध्दसराव करणार असल्याची घोषणा केली.

**<u>युक्रेन</u>**

युक्रेनमधील शांतता आणि सुरक्षा या विषयावर चर्चा करण्यासाठी युरोपिअन संघाच्या प्रमुख नेत्यांची काल पॅरिसमध्ये चौथी बैठक झाली. युक्रेनला आर्थिक आणि लष्करीदृष्ट्या पाठिंबा देण्याबाबत व्यापक चर्चा झाल्याचं युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन यांनी या बैठकीनंतर एका दुरस्थ संदेशात सांगितलं.

**<u>चिली</u>**

चीलीचे राष्ट्राध्यक्ष गॅब्रिएक बोरीक फॉन्ट येत्या 1 एप्रिलपासून पाच दिवसांच्या भारत भेटीवर येणार आहेत. भारत-चीली द्विपक्षीय संबंध दृढ करण्याच्या उद्देशानं ही भेट असेल, त्यांच्यासमवेत उच्चस्तरीय प्रतिनिधीमंडळ, चीलीचे मंत्रीमंडळ सदस्य, वरिष्ठ अधिकारी, व्यापारी प्रतिनिधी तसंच माध्यम प्रतिनिधींचा गटही भारत भेटीवर येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रपती दौपदी मुर्मू यांची ते भेट घेणार असून आग्रा, मुंबई आणि बेंगलूरू इथंलाही दौरा करतील

**उत्तर-प्रदेश**

येत्या काही दिवसांत साजऱ्या होत असेलल्या ईद-उल-फित्र सणाच्या पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेशचे पोलीस महासंचालक प्रशांत कुमार यांनी कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी सुरक्षा सुरक्षाविषयक मार्गदर्शक सुचना जारी केल्या आहेत. यानुसार, प्रभागातील सुरक्षा तैनातीसाठी संवेदनशील क्षेत्रे ओळखून पोलिस व्यवस्था करावी, सण साजरा करताना नवीन सुरू करु नये, प्रतिबंधात्मक कारवाईसाठी समाजकंटकांची यादी अद्ययावत करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. शांतता समितीतील सदस्य आणि धार्मिक नेत्यांसोबत बैठका घ्याव्यात असे निर्देश देण्यात आले आहे.

**नामांकन**

क्रीडा, समाजसेवा, कला क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या तसंच साहसी कामगिरी करणाऱ्या 5 ते 18 वर्षे वयोगटातील मुलां-मुलींना दरवर्षी प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारानं सन्मानित करण्यात येतं. या पुरस्कारांसाठी महिला आणि बालविकास मंत्रालयानं नामांकनं मागवली आहेत. येत्या 1 एप्रिलपासून 31 जुलैपर्यंत नॅशनल अ‍ॅवार्ड पोर्टलवर याबाबत अर्ज दाखल करता येतील.

**कुस्ती**

जॉर्डनमधील अमन इथं झालेल्या वरिष्ठ आशियाई अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत भारतानं काल एक रौप्य आणि 2 कास्य पदकांची कमाई केली आहे. काल स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी 76 किलो वजनी गटात भारताच्या ऋतिका हुड्डाला रौप्य तर 59 किलो वजनी गटात मुसकान आणि 68 किलो वजनी गटात मानसी लाथेर यांनी कास्य पदक मिळवलं. या स्पर्धेत भारतानं आत्तापर्यंत 5 पदकं जिंकली आहेत यात 1 रौप्य आणि 4 कांस्य पदकांचा समावेश आहे.

**खेलो इंडिया**

नवी दिल्लीत सुरू असलेल्या खेलो इंडिया पॅरा स्पर्धेचा काल समारोप झाला. हरियाणाने 104 पदकं जिंकून सर्वसाधारण विजेतेपदाचा मान मिळवला. या स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंनीही चमकदार कामगिरी करत पदक तालिकेत पाचवं स्थान पटकावलं. अखेरच्या दिवशी महाराष्ट्राच्या खेळाडूंनी टेबल टेनिसमध्ये 3 सुवर्ण, 3 कास्य पदकांची कमाई करत पदकांचा षटकार झळकावला. मुंबईच्या रिशित नथवानी, कोल्हापूरचे दत्तप्रसाद चौगुले आणि विश्व तांबेने सुवर्ण सांगता केली. विवेक मोरे, वैष्णवी सुतार आणि पृथ्वी बर्वे यांनी कास्य पदकांची कमाई केली. दत्तप्रसाद, आणि विश्व यांनी सलग दुसऱ्यांदा सुवर्ण पदकावर आपलं नाव कोरलं. टेबल टेनिसमध्ये सर्वसाधारण विजेतेपदाचा मानही महाराष्ट्राने पटकवला.पॅरा खेलो इंडियाच्या या दुसऱ्या पर्वात महाराष्ट्राने यंदा 18 सुवर्ण, 13 रौप्य आणि 12 कास्य अशी 43 पदकं पटकावली. अ‍ॅथलेटिक्समध्ये सर्वाधिक 23, बॅडमिंटनमध्ये 4, नेमबाजीत 3, तीरांदाजीमध्ये 2, भारोत्तोलनात 5, आणि टेबल टेनिसमध्ये 6 पदकं महाराष्ट्राच्या खात्यावर जमा झाली.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.